# महिला वरील अत्याचार व राजकारण : एक संक्षिप्त दृष्टिकोन

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

भारतीय संस्कृतीत स्त्रीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. स्त्रीची देवीच्या रूपात भारतात पूजा केली जाते. ती दुर्गा, लक्ष्मी तर साक्षात देवी म्हणून आपण तिच्यासमोर नतमस्तक होतो. स्त्रीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन आई-बहीण व मुलगी या पद्धतीचा असतो. प्रस्तुत शोधनिबंध महिलावरील अत्याचार व राजकारण: एक संक्षिप्त दृष्टिकोन या शोधनिबंधात संशोधकाने 2011 च्या नंतर घडलेल्या स्त्रीवरील अत्याचाराच्या मुख्य घटनांचा उल्लेख केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा आढावा घेताना संशोधकाने प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे तसेच काही गृहीतके समोर ठेवून शोधनिबंध पूर्ण केला आहे.

भारतीय समाजात स्त्रियांचे महत्त्व अनेक साधुसंत महात्मे महान समाज सुधारकांनी समाजाला सांगितले आहे. भारत हा विचार व तत्वज्ञानाचा खजिना आहे. या भूमीत जे महान सत्पुरुष वर महिला होऊन गेल्या. त्यांनी स्त्रियांचे समाजातील स्थान व प्रतिष्ठा समाजाला पटवून सांगितले आहेत. या पंक्तीमध्ये संत तुलसीदास, संत नामदेव, संत कबीर, संत रोहिदास, संत चोखामेळा, संत निवृत्तीनाथ, संत नरहरी सोनार, संत मीराबाई, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत बहिणाबाई, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ तर आधुनिक काळातील सुधारक राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेक भारतीय महान विभूतींनी महिलांच्या विषयी समाजात जागृती निर्माण केली होती. तसे महिला अत्याचाराचा विषय हा नवीन नाही प्राचीन काळापासून महिलावर अन्याय व त्याच्यावर होत आले आहेत. रामायण महाभारत व नंतरच्या काळात महिला वरील अत्याचार हे समाजाच्या समोर आहेत. जगामध्ये महिला या 50 टक्के एवढे आहेत.

50 टक्के महिला वर्ग असताना सुद्धा त्या आजही भारतीय समाजात अबला आहेत. दुसऱ्या बाजूला व्यवस्था सांगते की, महिला सक्षमीकरणामुळे महिला सबला झाल्या आहेत. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारातील समतेचे अधिकार (कलम 14 ते 18) मध्ये लिंगाच्या आधारावर कोणताच भेदभाव स्त्री व पुरुषात केला जाऊ नये असे सांगितले आहे. पण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पण महिलावर अत्याचारांच्या घटना प्रचंड प्रमाणात वाढत आहेत. दुसऱ्या बाजूला सत्तेवर असणारा राजकीय पक्ष सांगतो की, आमचे सरकार सत्तेवर आल्यापासून महिला व अत्याचार होत नाहीत पण सत्य परिस्थिती अतिशय गंभीर आहे. नॅशनल क्राईम रिपोर्ट डिपार्टमेंट एनसीआरबी या विभागांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. महिला वरील अत्याचारामध्ये राजस्थान क्रमांक एकवर तर महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. या अहवाला असे सांगितले आहे की, महिलावर अत्याचार करणाऱ्यांमध्ये कुटुंबातील लोक, जवळचे नातेवाईक, शेजारी, घरातील नोकर, मित्र, परिचयातील व्यक्ती व प्रियकर यांचा

समावेश आहे. उत्तर प्रदेश मध्ये सुद्धा 2020 मध्ये सगळ्यात जास्त अत्याचार झाले आहेत. असे सकाळ मधील जुलैच्या अंकातील बातमीत सांगितली आहे. पण यूपीच्या 2021 - 22 मधील विधानसभा निवडणुकीत राजकारण्यांनी सत्ता प्राप्त करण्यासाठी व महिलांना आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी महिला सुरक्षेचा मुद्दा उचलून धरला होता. भाजपा नंतर यूपीत महिला रात्री सुद्धा एकट्या बिनधास्त फिरू शकतात असे सांगितले होते. पण वास्तव व सत्य परिस्थिती वेगळी आहे. महिला वरील अत्याचाराच्या प्रकरणात राजकारण जास्त होत आहे. एखादी महिला अत्याचार प्रकरण बाहेर आले की त्या प्रकरणाला राजकीय रंग दिला जातो. प्रकरण कोणतेही असू द्या भारतीय महिलांच्या हक्काविषयी अनेक कायदे भारतात आहेत. असे असताना सुद्धा महिलावर दिवसेंदिवस अत्याचार वाढत आहेत. फक्त महिलावर पुरुषच अत्याचार करतात असे नाही, तर महिलावर महिला पण अत्याचार करतात. महिलांच्या अत्याचाराबाबत प्रस्तुत शोधनिबंधात काही उदाहरणे व त्या संदर्भात होणारे राजकारण याचा आढावा संशोधकांनी घेतला आहे ते पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहे.

**निर्भया प्रकरण :-**

निर्भया प्रकरण भारतात खूपच गाजले. त्यावेळी केंद्रामध्ये मनमोहन सिंह यांचे सरकार सत्तेवर होते. ही घटना भारताच्या राजधानीच्या ठिकाणी म्हणजे दिल्लीमध्ये 2012 ला घडली होती. एका मुलीवर मध्यरात्रीच्या सुमारास बसमध्ये सामूहिक अत्याचार करण्यात आला होता. त्या घटनेमुळे राजधानी दिल्ली सह संपूर्ण देश हा पेटून उठला होता. देशभरातून याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला, एवढेच नाही तर देशातील प्रत्येक गावात व शहरात निषेध मोर्चा व आंदोलने सर्वसामान्य जनतेने काढली होती. भारतातील प्रमुख विरोधी पक्षनेते अक्षरशः याविरुद्ध देशात आवाज उठवला होता. मनमोहन सिंह यांच्या सरकार विरुद्ध विरोधकांनी मोर्चे व आंदोलने केली. यामुळे संपूर्ण देशामध्ये सरकार, कायदा व सुव्यवस्था याविरुद्ध नाराजी व्यक्त होऊ लागली होती. निर्भया प्रकरणाचा लवकरात लवकर निकाल लागावा यासाठी मनमोहन सरकारने पावले उचलली जे आरोपी होते त्यांना अटक झाली. हा खटला अखेर गती न्यायालयाकडे सोपविण्यात आला. गुन्हेगाराला लवकरात लवकर शिक्षा होऊन गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा यासाठी सर्व ते प्रयत्न सरकारने केले होते. अशा घटना भविष्यात होऊ नये म्हणून गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्व पक्षांच्या मदतीने कायदा करण्यात आला आहे. पण जी निर्भया दिल्लीमध्ये मृत्यू पावली ती परत येणार आहे का? तर नाही संबंध प्रकरणांमध्ये विरोधी पक्षात असलेल्या भाजपाने संसदेत व संसदेच्या बाहेर या प्रकरणात जोरदार आवाज उठवला. महिलावरील अत्याचार आम्ही सहन करणार नाही अशी भूमिका विरोधी पक्ष असलेल्या भाजपाची होती. खरंच हे प्रकरण खूप गंभीर होते. या प्रकरणाचा सखोल तपास झाला. गुन्हेगारांना शिक्षा झाली आहे. निर्भया कायदा 2013 मध्ये मंजूर झाला आहे.

**2021 मधील हाथरस प्रकरण :-**

2021 मध्ये हाथरस (उत्तर प्रदेश) एका मुलीवर अत्याचार झाला आणि पुन्हा देशाला 2012 च्या निर्भया प्रकरणाची आठवण झाली. संपूर्ण देशभरात याविषयी नाराजी व असंतोष पसरला होता पण यावेळी केंद्रात भाजपाचे व उत्तर प्रदेशातही भाजपाचे सरकार सत्तेवर आहे. काँग्रेससह विरोधी पक्षाने याविरुद्ध आवाज उठवला एवढेच नाही तर राहुल गांधी व प्रियंका गांधी यांना हाथरस मध्ये पीडीतेला भेटण्यास बंदी करण्यात आली होती. तर प्रियंका गांधी यांना तर उत्तर प्रदेश पोलिसांनी धक्काबुक्की सुद्धा केली होती. यावेळी या प्रकरणावर निर्भयाप्रमाणे जास्त आवाज उठवला गेला नाही निर्भया प्रकरणात संपूर्ण देश निर्भयाला न्याय मिळावा म्हणून रस्त्यावर उतरला होता. पण हा हाथरस

पिडीतेला न्याय मिळावा यासाठी फक्त काँग्रेस पक्षच रस्त्यावर उतरला होता. पीडीतेला न्याय देणे व अशा प्रकारच्या घटना भविष्यात होणार नाहीत याची काळजी सरकारने व पोलिसांनी घेणे आवश्यक आहे. निर्भया प्रकरणात जनता, मीडिया विरोधी पक्ष व समाजसेवकांनी मोठा आवाज उठवला होता, पण तसेच हाथरस प्रकरणात पाहायला मिळाली नाही. सर्वजण गप्प होते मीडियातील काहीजण यावर बोलत होते पण उत्तर प्रदेशातील जनता मात्र गप्प होती. मात्र अशा परिस्थितीत सर्वसामान्य महिलावर अत्याचार वाढतच जाणार जर लोकांनी अशा घटनेवर आवाज उठवला तर असे प्रकरणे होणार नाहीत. या दोन्ही महिला अत्याचार प्रकरणाचा अभ्यास करताना राजकीय पक्षांनी जे राजकारण मतपेटीसाठी केले होते ते निंदनीय आहे. सर्वच पक्ष असे राजकारण करतात, भारतात करीत असतात. त्यामुळे राजकीय पक्ष महिला अत्याचार प्रकरणाकडे राजकारण म्हणूनच बघतात ही अतिशय गंभीर बाब आहे. देशात महिला अत्याचार प्रकरणासाठी राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यात येतो. पीडित महिलांना न्याय देण्यासाठी हा आयोग काम करतो पण या आयोगावर अध्यक्ष व सदस्य नियुक्त हे सरकार पक्षाचे नेते, कार्यकर्ते असतात मग हे पदाधिकारी महिलांना न्याय देतील का, कारण जर सरकार पक्षाच्या नेत्यांनी किंवा पक्षातील कार्यकर्त्यांनी महिलेवर अत्याचार केला तर या आयोगाची भूमिका पक्षपातीपणाची असते. हीच परिस्थिती राज्य महिला आयोगाची आहे हे आयोग फक्त राजकीय सोय नेत्याची म्हणून स्थापना झालेली आहे.

**निष्कर्ष :-**

देशात गेल्या अनेक वर्षापासून महिलावर अन्याय व त्याच्या सतत वाढत आहेत. यावर अनेक उपाययोजना कायदे, नियम, समाज प्रबोधन पण झाले. पण अत्याचार काही थांबत नाहीत. निर्भयानंतर कठोर कार्यवाही झाली, कायदा झाला पण अत्याचार थांबले नाहीत. यासाठी संपूर्ण देशभरात समाजाचे प्रबोधन होणे व महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन माझी आई, बहीण व मुलगी असा होणार नाही. तोपर्यंत अशी प्रकरणे घडतच राहणार. म्हणून प्रत्येक पुरुषाने त्यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे. पुरुषाप्रमाणेच महिलांनी सुद्धा जबाबदारी व समजूतने वागले पाहिजे. बरेच प्रकरणात महिलांचा सुद्धा सहभाग महिला अत्याचारात असतो. ज्यावेळी सून आणि सासूचे हुंडा, अत्याचार, छळ, त्रास देणे अशी प्रकरणे बाहेर येतात तेव्हा एक महिला दुसऱ्या महिलेचा छळ का करते यावर सुद्धा विचार केला पाहिजे. हैदराबाद मध्ये एका मुलीवर अत्याचार झाला तेव्हा तेलंगणा सरकारने कायदा व न्यायालयीन लढ्याची वाट न बघता सरळ गुन्हेगारांना गोळ्या घालून ठार केले होते. हा मार्ग लोकशाहीला हानिकारक आहे तेव्हा कठोर कायदे तात्काळ निकाल व त्याची अंमलबजावणी होणे हे आवश्यक आहे. तर महिला अत्याचाराची प्रकरणी कमी होतील हे निश्चित.

**संदर्भ :-**

1) www.wikipedia.nirbhayaactcriminalwoman
2) www.wikipedia.2020hatrasgangarapemurdercase